**ठळक बातम्या**

- देशातलं क्षयरोगाचं कमी झालेलं प्रमाण, हे समर्पण भावनेनं केलेल्या नाविन्यपूर्ण प्रयत्नांचं फलित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर समान नागरी कायदा लागू करण्याचं, मात्र आदिवासींना त्याच्या कक्षेतून बाहेर ठेवण्याचं भाजपाचं आश्वासन

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा उद्या शेवटचा दिवस, मराठवाड्यात सर्वाधिक तर कोकणात सर्वात कमी उमेदवार रिंगणात

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यातही भारतीय संघ पराभूत, तब्बल १२ वर्षानंतर मायदेशात कसोटी मालिका गमावली

**<><><><><>**

देशातलं क्षयरोगाचं कमी झालेलं प्रमाण, हे समर्पण भावनेनं केलेल्या नाविन्यपूर्ण प्रयत्नांचं फलित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतात २०१५ ते २०२३ या कालावधीत क्षयरोगाचं प्रमाण १७ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांनं घसरल्याचं जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे. आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी काल याबाबत समाज माध्यमांवरून माहिती दिली होती. त्याचाच दाखला देत प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरून भारताच्या या प्रगतीचं कौतुक केलं. या पुढेही सरकार देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी सामूहिक भावनेनं काम करत राहील, असंही प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर समान नागरी कायदा लागू करू, मात्र आदिवासींना त्याच्या कक्षेतून बाहेर ठेवू असं आश्वासन भाजपानं दिलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचं पक्षाचं संकल्प पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज रांचीमध्ये प्रसिद्ध केलं. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिलं.

कायदा झाल्यावर आदिवासींना त्यांच्या जमिनी पुन्हा दिल्या जातील. गोगो दीदी योजनेअंतर्गत सर्व महिलांना एकवीसशे रुपये देऊ असं आश्वासन त्यांनी दिलं. सर्व कुटुबांना ५०० रुपयात गॅस सिलिंडर, दसरा आणि रक्षाबंधनला १-१ गॅस सिलिंडर मोफत देण्याचं आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं. पदवीधर आणि पदव्युत्तर बेरोजगारांना २ वर्षांसाठी २ हजार रुपये मानधन देऊ. ५ वर्षात रोजगाराच्या ५ लाख संधी निर्माण करु. सरकारमधल्या ८७ हजार रिक्त जागा भरू असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतानं  परराष्ट्रसंबंधाची एक अशी चौकट तयार केली आहे ज्यायोगे येत्या काळात ऑस्ट्रेलियासोबतचे संबंध अधिक वृद्धिंगत होतील असं प्रतिपादन परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज ब्रिस्बेन इथं भारतीय समुदायाला संबोधित करताना केलं, ते आपल्या सहा दिवसांच्या ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर दौऱ्यासाठी आज ब्रिस्बेन इथं पोहोचले. जयशंकर म्हणाले की, भारत विकासाच्या दिशेनं मार्गक्रमण करत आहे आणि जगासोबत विकसित होऊ इच्छित आहे. ते म्हणाले की, भारताची जगातील निवडक देशांसोबत सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी आहे आणि ऑस्ट्रेलिया हा त्यांपैकी एक आहे.

या भेटीदरम्यान ते ब्रिस्बेनमधे ऑस्ट्रेलियामधल्या भारताच्या चौथ्या वाणिज्य दूतावासाचं उद्धाटन करतील. कॅनबेरा इथं ते ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांच्यासोबत परराष्ट्रमंत्र्यांच्या १५ व्या फ्रेमवर्क संवाद परिषदेचं संयुक्त अध्यक्षपदही

भूषवणार आहेत. ऑस्ट्रेलियाच्या संसद भवनात होणाऱ्या दुसऱ्या रायसिना डाउन अंडरच्या उद्घाटन सत्रात ते बीजभाषण देणार आहेत. या दौऱ्यात ते ऑस्ट्रेलियन नेते, संसद सदस्य, ऑस्ट्रेलियात स्थायिक भारतीय लोक, व्यापारी समुदाय, माध्यमं आणि थिंक टँक यांच्याशीही संवाद साधणार आहेत. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, डॉ. जयशंकर या महिन्याच्या ८ तारखेला अधिकृत भेटीसाठी सिंगापूरला जाणार आहेत.

**<><><><><>**

केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार प्रियांका गांधी आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज जाहीर सभा घेतली. प्रियांका गांधी कोरोम आणि थरिओडे इथंही प्रचारसभा घेणार आहेत. तर राहुल गांधी अरीकोड इथं प्रचारसभा घेणार आहेत.

एलडीएफचे उमेदवार सत्यन मोकेरी यांनी तिरुवंबडी भागात प्रचार केला, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार नव्या हरिदास यांनी कलपेट्टा इथं घरोघरी जाऊन प्रचार केला.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. २८८ मतदारसंघांमध्ये एकंदर ७ हजार ६६ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. मराठवाड्यातल्या मतदारसंघांमध्ये सर्वाधिक उमेदवार आहेत तर कोकणात उमेदवारांची संख्या अतिशय मर्यादित आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या भोकर विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे १४० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्याखालोखाल बीड जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात ९८, तर बीडमध्ये ९० उमेदवारांचे अर्ज वैध आहेत. राज्यात महाड

विधानसभा मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे फक्त ५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भाजपाच्या विधिमंडळ पक्षाने आज एकमताने सुनील शर्मा यांची नेता म्हणून निवड केल्याने जम्मू आणि काश्मीर विधानसभेतले विरोधी पक्षनेते म्हणून त्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. सुनील शर्मा हे माजी मंत्री तसंच किश्तवाडच्या पाडेर-नागसेनी मतदारसंघाचे आमदार आहेत.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा २५ धावांनी पराभव केला, आणि मालिका ३-० अशी जिंकली. भारतीय संघानं तब्बल १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली आहे. सन २०००नंतर पहिल्यांदा भारताला देशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात न्यूझीलंडचा दुसरा डाव केवळ १४ चेंडूत ३ धावांची भर घालून १७४ धावांवर आटोपला. न्यूझीलंडच्या

उर्वरीत एका खेळाडूला रविंद्र जडेजानं बाद केलं, आणि दोन्ही डावांत प्रत्येकी ५ गडी बाद करत, सामन्यात एकूण १० बळी टिपले. पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळे भारतासमोर विजयासाठी १४७ धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी गडगडली, आणि भारताचा दुसरा डाव केवळ १२१ धावांत आटोपला. ऋषभ पंतनं सर्वाधिक ६४ धावा केल्या. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं दुसऱ्या डावात भारताचे ६ गडी बाद करत सामन्यात एकूण ११ बळी टिपले. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. विल यंग मालिकावीर ठरला.

**<><><><><>**

आज भाऊबीज, दिवाळीचा शेवटचा दिवस. भावाबहिणीच्या गोड नात्याला समर्पित असलेला हा सण देशाच्या वेगवेगळ्या भागात, भाई फोटा, भाई टीका, यमद्वितीया अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या सणामुळे भावाबहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगर इथं आकाशवाणीच्या कार्यालयाबाहेर रविवारच्या बाजारात झालेल्या ग्रेनेडच्या स्फोटात किमान १० नागरिक जखमी झाले. टीआरसी क्रॉसिंग भागात दहशतवाद्यांनी सुरक्षादलांच्या वाहनांच्या दिशेनं एक ग्रेनेड फेकला, मात्र त्यांचा नेम चुकल्यानं तो रस्त्यावर फुटला. पोलिसांनी या भागात नाकेबंदी करून आरोपींना शोधण्यासाठी व्यापक मोहीम सुरू केली आहे.

दरम्यान, नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी पोलीस महासंचालक नलीन प्रभात आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी या हल्ल्याबाबत चर्चा केली आणि यामागे ज्यांचा हात आहे, त्या दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर द्यावं, अशी सूचना त्यांना दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात भाजपाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत, त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिला.

**<><><><><>**

महाराष्ट्रात, रिपब्लिकन पक्षाच्या ज्या कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज भरले आहेत; त्यांनी आपले अर्ज मागं घ्यावेत, असं आवाहन रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे यांनी केलं आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार, रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी बाजूला ठेवून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा, आणि महायुतीला विजयी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असं त्यांनी आज प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीबाबतचा अंतिम निर्णय घेण्यासाठी आज आंतरवाली सराटी इथं सहकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या निवडणुकीत कोणत्या जागा लढवायच्या याबाबत या बैठकीत प्राथमिक चर्चा झाली. ज्या जागा जिंकून येणं शक्य आहे तिथंच उमेदवार देऊ आणि इतर ठिकाणी आपल्याला त्रास देणाऱ्यांचा पराभव करू, अशी भूमिका जरांगे यांनी यावेळी मांडली. मराठवाड्यातल्या जालना, भोकरदन, बीड, केज, फुलंब्री, कन्नड आणि हिंगोली या मतदारसंघांमध्ये उमेदवार देण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या कापूस शेतकऱ्यांचं हित लक्षात घेऊन केंद्र सरकारनं कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून हमीभावानं कापूस खरेदी करण्याचे निर्देश भारतीय कापूस महामंडळाला द्यावेत द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे केली आहे. २२ लाख गाठी कापसाची आयात झाल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या दरात मोठी घसरण होण्याची शक्यता आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विकल्या न गेलेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत, असं पटोले यांनी पत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्रायल सैन्याच्या विशेष दलानं उत्तर लेबनॉनमध्ये केलेल्या कारवाईत हिजबुल्लाहच्या एका वरिष्ठ म्होरक्याला ताब्यात घेतलं. इमाद अम्हाज असं या ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचं नाव आहे. सध्या त्याची लष्कराच्या गुप्तचर विभागाकडून त्याची चौकशी केली जात असल्याची माहिती इस्रायलनं दिली आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या आरमोरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार हरिराम वरखडे यांचं काल रात्री नागपुरात एका खासगी रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. आज दुपारी आरमोरी तालुक्यातल्या जोगीसाखरा या त्यांच्या मूळ गावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**//<><><><><>//**